# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दूरध्वनी – ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६

E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा. क्र. तंशिविकापु/विवि/२०१९/ 3367 दिनांक :- 13/08/2019

प्रति,
प्राचार्य/संचालक,
या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त असलेल्या,
सर्व पदविका तसेच व्यवसायीकअभ्यासक्रमाच्या पदवी व
पदवीत्तर पदवी संस्था

विषय :- सन २०१९-२० साठी National Scholarship Portal वरील केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती (Merit cum Means Based Scholarship) योजनेच्या अंमलबजावणीबाबत.

संदर्भ :- १) सचालनालयाचे पत्र क्र १८/तंशिस/संस्था-पत्र/MCN/2019/340 दि २०/०७/२०१९
२) सचालनालयाचे पत्र क्र १८/तंशिस/संस्था-पत्र/MCN/2019/382 दि ०९/०८/२०१९

उपरोक्त विषयास अनुसरुन या विभागीय कार्यालयाचे अधिनस्त सर्व पदविका /पदवी व पदवीत्तर पदवी संस्था यांना सुचित करण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालय,म.राज्य,मुंबई यांचे मार्फत मुस्लिम,ख्रिश्चन,शीख,बौध्द,पारशी व जैन या अल्पसंख्याक समाजातील तांत्रिक व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यासाठी केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता नि-साधना शिष्यवृत्ती योजना केद्र शासनाच्या National Scholarship portal (www.Scholarships.gov.in द्वारे ऑनलाईनरित्या राबविली जाते.

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार सर्व संबधित अभ्यासक्रम चालविणा-या महाराष्ट्र राज्यातील संस्थाना केंद्र शासनाच्या National Scholarship portal (www.Scholarships.gov.in वर संस्थेच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Login अंतर्गत उपलब्ध असलेला Registration Form काळजीपूर्वक संपूर्ण भरुन त्याची साक्षांकीत प्रत मंजूरीसाठी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.राज्य,मुंबई यांचेकडे जमा करण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

तरी या पत्राद्वारे पुनःश्च कळविण्यात येते की, उपरोक्त अभ्यासक्रम चालविणा-या महाराष्ट्र राज्यातील सर्व संबंधित संस्थापैकी ज्या संस्थांनी Registration Form जमा करुन मंजूरी घेतलेली नाही अशा संस्थांनी केंद्र शासनाच्या National Scholarship portal (www.Scholarships.gov.in ) वर संस्थेकडे असलेला पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Login अंतर्गत उपलब्ध असलेला Operational Manual अंतर्गत देण्यात आलेल्या "To Fill Registration Form" मध्ये दिलेल्या सूचनांनुसार Registration Form काळजीपूर्वकरित्या संपूर्ण भरुन त्याची साक्षाकीत प्रत (Printout with duly signed )संस्थेच्या पत्राद्वारे संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांच्याकडे ८ दिवसांच्या आत पाठविण्यात यावे. संस्थेच्या Registration Form मधील माहितीला मंजूरी मिळाल्यानंतर संस्थेच्या नोडल ऑफीसरच्या मोबाईल नंबरवर ऑनलाईन प्रणालीद्वारे संस्थेला नवीन पासवर्ड प्राप्त होईल. सदर पासवर्ड द्वारे Institute Profile अद्यावत करण्यात यावे. संस्थेतील विद्यार्थ्यांना National Scholarship portal (www.Scholarships.gov.in ) वर उपलब्ध योजनासाठी अर्ज करता न आल्यास त्याबाबतची संपुर्ण जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

पदवीका संस्थानी त्यांचे Registration Form ची सांक्षाकिंत प्रतसंचालक उच्च शिक्षण संचालनालय यांच्याकडे जमा करावी.

Gaikwad 13.8.19
f प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

F/c


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई. ४०० ००१

दूरध्वनी क्र. २२६१७९६९ फॅक्स क्र. २२६९०००७

E-mail: desk१८@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**स्मरणपत्र/अतितात्काळ -- स्पीडपोस्ट/ईमेलद्वारे** का.क्र.१८/तंशिसं/संस्था-पत्र /MCM/२०१९/ ३८२

दिनांकः- ०९/०८/२०१९

प्रति,

सर्व संबंधीत संस्थाचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता,

(मान्यताप्राप्त तांत्रिक व व्यावसायिक पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या संस्था)

**महाराष्ट्र राज्य.**

**विषय :- सन २०१९-२० साठी** National Scholarship Portal **वरील केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती ( Merit cum Means Based Scholarship ) योजनेच्या अंमलबजावणीबाबत...**

**संदर्भ :-** १. या संचालनालयाचे पत्र क्र.१८/तंशिसं/संस्था-पत्र /MCM/२०१९/३४०दि.२०/०७/२०१९

२. मिनिस्टरी ऑफ मायनॉरिटी अफेअर्स, न्यू दिल्ली यांचे पत्र दि. ०५/०८/२०१९

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, तंत्रशिक्षण संचालनालय,म.राज्य, मुंबई (State Nodal Officer) यांचेमार्फत मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौध्द, पारशी व जैन या अल्पसंख्यांक समाजातील तांत्रिक व व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांत ( Under graduate and Post graduate levels Technical and professional courses - Engineering/Technology, Cement Technology, Fashion Technology, Pharmacy, Architecture & Town Planning, Hotel Management & Catering Technology, Applied Arts & Crafts, MCA, MBA/MMS, Health Science Courses, Law (LLB/LLM), Veterinary Sciences and Animal Husbandry ) शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी **केंद्रशासन पुरस्कृत गुणवत्ता-नि-साधन शिष्यवृत्ती ( Merit cum Means Based Scholarship ) योजना** राबविली जाते. योजनेबाबतची अधिक माहिती मिनिस्टरी ऑफ मायनॉरिटी अफेअर्सच्या संकेतस्थळावर ( www.minorityaffairs.gov.in ) उपलब्ध आहे. सदर योजना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( www.scholarships.gov.in ) द्वारे ऑनलाईनरित्या राबविली जाते.

उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार सर्व संबंधित अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील संस्थांना केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( www.scholarships.gov.in ) वर संस्थेच्या लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Login अंतर्गत उपलब्ध असलेला Registration Form काळजीपूर्वक संपूर्ण भरुन त्याची साक्षांकीत प्रत मंजूरीसाठी संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,म.राज्य, मुंबई यांचेकडे जमा करण्याबाबत कळविण्यात आलेले होते.

तरी या पत्राद्वारे पुनःश्च कळविण्यात येते की, उपरोक्त अभ्यासक्रम चालविणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील सर्व **संबंधित संस्थांपैकी ज्या संस्थांनी** Registration Form जमा करुन मंजूरी घेतलेली नाही **अशा संस्थांनी** केंद्र शासनाच्या National Scholarship Portal ( www.scholarships.gov.in ) वर संस्थेकडे असलेला पोर्टलचा लॉगीन आयडी व पासवर्डचा वापर करुन Institute Login अंतर्गत उपलब्ध असलेल्या Operational Manual अंतर्गत देण्यात आलेल्या " To Fill Registration Form " मध्ये दिलेल्या सूचनांनुसार, Registration Form काळजीपूर्वकरित्या संपूर्ण भरुन

(कृ.मा.प.

त्याची साक्षांकीत प्रत ( Printout with duly signed) संस्थेच्या पत्राद्वारे *संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमा समोर, म.राज्य, मुंबई -४०० ००१* यांचेकडे ८ दिवसांच्या आत मंजूरीसाठी पाठविण्यात यावी. संस्थेकडून Registration Form मध्ये भरलेल्या माहितीला मंजूरी मिळाल्यानंतर संस्थांच्या नोडल ऑफीसरच्या मोबाईल नंबरवर ऑनलाईन प्रणालीद्वारे संस्थेला नवीन पासवर्ड प्राप्त होणार आहे. त्या प्राप्त पासवर्डचा वापर करुन संस्थांनी Operational Manual अंतर्गत देण्यात आलेल्या "To Update Profile" मध्ये दिलेल्या सूचनांनुसार, Institute Profile अद्ययावत करुन घ्यावी. अन्यथा या कारणास्तव संस्थेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना National Scholarship Portal वर उपलब्ध योजनेकरिता जर अर्ज करता आला नाही तर त्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखांची राहील याची नोंद घ्यावी.

टीप – ज्या संस्था National Scholarship Portal ( www.scholarships.gov.in ) वर नोंदणीकृत झालेल्या नाहीत ( यादी पोर्टलवर उपलब्ध ) किंवा संस्था पूर्वीचा लॉगीन आयडी व पासवर्ड विसरली असेल अशा महाराष्ट्र राज्यातील संस्थांनी (उपरोक्त अभ्यासक्रम चालविणाऱ्या ) खालील प्रपत्रातील माहिती संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग, मेट्रो सिनेमा समोर, म.राज्य, मुंबई -४०० ००१ यांच्याकडे पाठविण्यात यावी जेणेकरुन ऑनलाईन सिस्टिमद्वारे Login_Id व Password प्रपत्रामध्ये दिलेल्या मोबाईल नंबरवर पाठविता येईल व संस्थांना त्याचा वापर करुन वरील दिलेल्या पध्दतीने Registration Form भरुन मंजूरीसाठी जमा करता येईल.

| Information of Institute for receiving the Login Id and Password of **National Scholarship Portal** | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| AISHE (All India Survey on Higher Education) Code (ex. C-XXXXX) | Previous Registered Code on NSP Portal / Login_Id of Portal ( If Institute have ) otherwise mention " NA" | Institute Name as per AISHE (All India Survey on Higher Education) Code | Institute Address | Institute District | Details ( on which Login_id and Password will be required ) | |
| | | | | | Name | Mobile No. |
| | | | | | | |

( डॉ. अभय वाघ. )<br>संचालक,<br>तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

**महत्त्वाची टिप::**

दहावी व बारावी नंतरचे पदविका अभ्यासक्रम हे केंद्र शासनाच्या **पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती** अंतर्गत येत असल्याने पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी *संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे* (State Nodal Officer) यांच्याकडे संपर्क साधून Registration Form ची साक्षांकीत प्रत जमा करावी. ( संकेतस्थळ : www.dhepune.gov.in)

(कृ.मा.प.